# प्रेस नोट

## युनिट ५, गुन्हे शाखा, पुणे शहर आयुक्तालय दिनांक २०/०६/२०१९

## युनिट-५, गुन्हे शाखेकडुन राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २, पुणे सशस्त्र पोलीस भरती सन २०१८ मधील मुख्य आरोपी अटक

---०००---

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे येथे दि. १२/०३/२०१८ ते दिनांक २१/०४/२०१८ पर्यंत सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी पोलीस भरतीच्या प्रक्रियेत उत्तर पत्रिकेचे तपासणीमध्ये मे.ई.टी.एच.लि.पुणे येथील पाहिजे आरोपीतांनी चैत्रबन विश्राम गृह, पुणे येथे दिनांक २१/०४/२०१८ रोजी ११/४० वा ते दिनांक २२/०४/२०१८ रोजी ०४/०० वा.चे दरम्यान अटक व पाहिजे आरापी यांनी आपसात संगणमत करून पुर्वी ठरल्याप्रमाणे नियोजन बध्द पध्दतीने कट रचून लेखी परीक्षेस वरील उमेदवारांना मोजकेच प्रश्न सोडण्यास सांगून मुख्य आरोपी प्रविण भटकर व इतर चार साथीदार आरोपी याचे मदतीने उत्तर पत्रिकेत प्रश्नाच्या उत्तराच्या ठिकाणी गोल करून फसवणूक करण्याकरीता बनावटीकरण करून ती उत्तर पत्रिका खरी आहे असे भासवून बनावट दस्तऐवज तयार केला. तसेच उमेदवारांना गुण वाढवून अवैद्य मार्गाने निवड होण्याकरीता मदत करून शासनाची फसवणूक केली आहे म्हणुन वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं.१७४/२०१८ भा.दं.वि. क.४२०,४६५,४६८,४७१,१२०(ब),३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्हयाचा तपास श्री. दत्तात्रय लक्ष्मण चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट-५, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करीत आहोत.

दाखल गुन्हयातील निष्पन्न व पाहिजे मुख्य आरोपी नामे प्रविण दत्तात्रय भटकर वय ३४ वर्षे धंदा व्यवसाय रा. श्री अपार्टमेंट फ्लॅट नं.८ शिंदेनगर, मराठा मंदीराजवळ बावधान पुणे ४११०२१ मूळ रा.द्वारा- विक्रमसिंग परिहार, बंगला नं.९, कॉग्रेसनगर, राष्ट्रपती बंगल्याचे पाठीमागे, अमरावती,व मु.पो.मुरांबा ता.मुर्तिजापूर जि.अकोला हा त्याचे वकीलांना भेटण्यासाठी पुण्यात येणार असल्याने त्यास ताब्यात घेऊन दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. त्याने गुन्हयाचे कबुली दिली असुन त्यास मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लष्कर न्यायालय, पुणे येथे हजर केले असता सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. पाटील साहेब यांनी प्रभावीपणे बाजु मांडली. सरकारी पक्ष व आरोपीच्या वकीलाच्या दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन मा. श्रीमती रोहिणी पाटील मॅडम, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लष्कर न्यायायल, पुणे यांनी गुन्हयाचे गांभीर्य व व्याप्ती पाहुन तपासकरीता वेळ गरजेचे असल्याने आरोपीची दिनांक २८/०६/२०१९ रोजी पर्यंत अशी ०९ दिवसाची पोलीस कस्टडीचे रिमांड मंजुर केले आहे.

तसेच सदरचा आरोपी हा नांदेड व हिंगोली येथील पोलीस भरती प्रक्रिया घोटाळ्यातील मुख्य आरोपी आहे.

**सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, पुणे शहर श्री. अशोक मोराळे, मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. शिरिष सरदेशपांडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी वपोनि श्री.दत्ता चव्हाण, स.पो.निरी. भालचंद्र ढवळे, स.पो.निरी. संतोष तासगांवकर, पो.उप.नि. शेंडगे, पोलीस स्टाफ, अजय जाधव, संतोष मोहिते, प्रदीप सुर्वे, राजेश रणसिंग, दत्ता काटम, समीर शेख, राजाभाऊ भोरडे, केरबा गलांडे, संजय देशमुख, अमजद पठाण, महेश साळवी, सचिन घोलप, प्रमोद घाडगे, दया शेगर, प्रमोद गायकवाड, अंकुश जोगदंडे, महेश वाघमारे, प्रविण काळभोर, मपोशि स्नेहल जाधव, संजयकुमार दळवी यांनी ही कामगिरी केलेली आहे.**